Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

## Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

**January -2023**

**(CCCLXXXVII) 387**




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

# Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

All rights reserved with the authors & publisher

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

| | | |
|---|---|---|
| 19 | चांदागडचे गोंड राजे रामशहा यांचे सामाजीक व सांस्कृतीक योगदान डॉ. प्रमोद ना. घ्यार | 82 |
| 20 | भारतातील मत्स्य उत्पादनाचा अभ्यास प्रा. डॉ. मौलाना महेताब सय्यद | 85 |
| 21 | डॉ. जनार्दन वाघमारे हयांच्या 'मूठभर माती' या आत्मचरित्रातील शैक्षणिक जाणिवांचा अभ्यास डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे | 89 |
| 22 | नविन शैक्षणिक धोरण आणि संगीत : अंमलबजावणी आणि आव्हाणे डॉ. राहुल मल्हारी भोरे | 94 |
| 23 | छत्रपती शाहू महाराज यांच्या भाषणातील परिवर्तनवाद डॉ. अशोक जाधव | 98 |
| 24 | दुग्धजन्य व्यवसाय एक स्वयंरोजगार डॉ संजय ज तिडके , प्रा सुवर्णा दिनकर गोतरकर | 102 |
| 25 | असहकार आंदोलनामध्ये बुलढाणा जिल्ह्याचे योगदान प्रा.डॉ.अमोल रमेशराव बोरकर | 106 |
| 26 | उस्मानाबाद तालुक्यातील पिक प्रारुंपाचा भौगोलिक अभ्यास डॉ.आसाराम दि.चव्हाण | 109 |
| 27 | घरकाम (मोलकरीण) करणा-या स्त्रीयांचा समाजशास्त्रीय अभ्यास प्राचार्य डॉ.कल्याण मोरे | 113 |
| 28 | बंजारा लोकगीतातील महिलांचे योगदान प्रा. डॉ. डी. एस. पवार | 119 |
| 29 | चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी बालकांच्या कुपोषणा संबंधी आहारविषयक समस्या व त्यावरील उपाय डॉ. कीर्ती आ. वर्मा | 122 |
| 30 | भारतीय राजकीय तत्वज्ञान प्रा.डॉ.कऱ्हाळे विलास लिंबाजी | 127 |
| 31 | आदिवासी कवितेतील आत्मभान: एक आकलन प्रा. डॉ. एकनाथ वैजनाथ भिंगोले | 129 |
| 32 | चलेजाव आंदोलनात मातृभूमि वृत्तपत्राचे योगदान प्रा.डॉ.संतोष गोपाळकृष्ण कुळकर्णी | 133 |
| 33 | स्थानिक स्वराज्य संस्थानच्या राजकारणातील युवकांचा सहभाग एक चिकिसात्मक अभ्यास प्रा. ए.बी . राऊत | 136 |
| 34 | गव्हाणी अस्तित्वाचा झगडा प्रा.डॉ.कदम सुरेश व्यंकटराव | 139 |
| 35 | श्री चक्रधर स्वामी– आद्य समाजोद्धारक डॉ. महेंद्र झलके | 143 |
| 36 | डॉ. शंकर शेष के 'पोस्टेर' नाटक में रंगमंचिय अनुभूति डॉ. अनिल अ. पाखरे | 147 |
| 37 | मुस्लिम परिवेश को व्यक्त करने वालीनासिरा शर्मा का कहानी संसार। डॉ.विलास तुकाराम राठोड | 151 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCLXXXVII) 387
ISSN : 2278-9308
January, 2023

# डॉ. जनार्दन वाघमारे हयांच्या 'मूठभर माती' या आत्मचरित्रातील शैक्षणिक जाणिवांचा अभ्यास

डॉ. चंद्रशेखर सुधाकर देवघरे
स्व. निर्धन पाटील वाघाये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लाखनी, जि. भंडारा.
भ्रमणध्वनी :– ९७६४९०५२२२ Email:- geogharechandrashekhar@gmail.com

❖ प्रस्तावना :–

डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या 'मूठभर माती' या आत्मचरित्रात जन्मापासून शिक्षण घेण्यापर्यंतचा सारा संघर्ष अधोरेखीत केला आहे. तर काहीही हातचे न राखता प्राध्यापक, प्राचार्य कुलगुरु ते नगराध्यक्ष होण्यापर्यंतचा एकूणच झंझावाती इतिहास अतिशय मर्मग्राहीपणे रेखाटला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वात शिक्षण, वाङ्मय आणि राजकारण तथा समाजकारण अशा उच्च कोटीच्या तिहेरी गुणांचा समुच्चय एकवटल्याचे दिसून येते. कठोर मेहनत, ज्ञानपिपासू वृत्ती, लोभस स्वभाव, मनमिळवू वृत्ती आणि निस्वार्थी प्रवृत्ती यामुळेच त्यांना कुलगुरु पदापर्यंतची आणि पुढे नगराध्यक्ष पदापर्यंतची मजल मारता आली. त्यांचे नेमके परिशीलन करण्यात आले आहे. डॉ. जनार्दन वाघमार हे अंधश्रध्देच्या विरोधात होते. दरवर्षी पितरांना श्राध्द घालण्याची पूर्वापार परंपरा त्यांच्या घरात होती; ती त्यांनी बंद केली. सत्यनारायणाची पूजा, देव्हाऱ्यातील देवांची पूजा त्यांनी बंद केली. त्यांचा मूर्तीपूजेला विरोध होता. ते सुधारणावादी, परिवर्तनवादी होते. गरिबीवर मात करीत त्यांनी स्वत:ची प्रगती साधली. हया अवाढव्य असलेल्या जीवनसंघर्षाचा येथे चिकित्सक अभ्यास करण्यात आला असून त्यातून त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व उलगडून दाखवता आले.

'मूठभर माती' हया आत्मचरित्राचे स्वरुप व आशय :–

प्रस्तुत आत्मचरित्रात लातूरच्या राजर्षी शाह महाविद्यालयाचा फार मोठा भाग येतो. तिथे प्राचार्य असतांना त्यांची शैक्षणिक क्षेत्रात केलेली कामगिरी अतुलनीय अशी आहे. त्यांनी केलेली शैक्षणिक क्रांती 'लातूर पॅटर्न' म्हणून ओळखली जाते. ते त्या क्रांतीचे जनक आहेत. त्यांच्या या भरीव कार्यामुळे ते नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यपीठाचे पहिले कुलगुरु झाले. त्यांच्या गावात बलुतेदारी आणि अलुतेदारी पध्दती होती. सामाजिक विषमता त्यांनी पाहिली होती. आर्य समाजाचे त्यांच्यावर संस्कार होते.म. गांधी. डॉ. आंबेडकर यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव मिळावे या बाजूने ते राहिले. ते विलक्षण अभ्यासू आणि द्रष्टे होते. आपल्या कामाप्रती ते प्रामाणिक आणि जिद्दी होते.

प्रस्तुत आत्मचरित्राचे निवेदन करताना रसिकांना कंटाळवाणे विवेचन होणार नाही याची ते काळजी घेतात. कधी ते नर्म विनोदही करतात. त्यांच्या निवेदनात ताजेपणाचा गंध दरवळत राहतो. बरेचसे इंग्रजी अवतरणे त्यात घालुन ते जीवनासच प्रभावीपणे मांडतात. त्यांनी प्रमाणभाषेतून निवेदन केले आहे. कधी प्रसंगोपात बोलीचा वापर करुन संवाद साधण्याची त्यांची सचोटी रसिकांना भावणारी आहे. त्यांच्या आत्मकथनात कलामूल्ये आणि जीवनमूल्ये या दोहोंचा मिलाप असलेला दिसतो. सत्य, शिव आणि सौंदर्य ही तीन तत्वे त्यांच्या आत्मकथनात ठासून भरलेली आहेत. या आत्मकथनात चर मूल्यांबरोबर अचर मूल्ये आणि वाङ्मयीन मूल्येही आहेत. प्रस्तुत आत्मचरित्रात बुध्दितत्व, भावतत्व, कलातत्व आणि शैलीतत्वाचे संमिश्रण पाहायला मिळते. त्यांच्या भाषाशैलीत रमणीयता, भावनानुकुलता, सरलता, अभिव्यंजकता, प्रांजळपणा आणि स्पष्टपणा ठळकपणे पाहायला मिळतो. सहज धावती, ओघवती वर्णनशैली हे त्यांच्या आत्मचरित्राचे वैशिष्टये असल्याचे संशोधनाअंती दिसून आले.

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी वैचारिक लेखन, काव्यलेखन, निबंधलेखन, प्रबंधलेखन, ललित लेखन अशा विविध साहित्यप्रकारांच्या बावीस ग्रंथाचे लेखन केले आहे. त्यांच्या आत्मकथनात प्रांजळपणा व सहजता, लालित्य व वैचारिकता, तात्विक मीमांसा व व्यवहार्यता, मृदुता व कर्तव्यकठोरता अशा सर्व गुणांचा समुच्चय पाहायला मिळतो. त्यांच्या लिखानात आवश्यक तिथे सुभाषिते, म्हणी आणि वाक्यप्रचारांचा वापर केला आहे. त्यामुळे त्यांची चिंतनाची तात्विक बैठक उठून दिसते. त्यांच्या जीवननुभवाला व्यापकत्व प्राप्त होते. त्यांचे जीवन ग्रामीण समुदायात त्यातल्यात्यात लहानशा खेडयात गेल्यामुळे तेथील बोलीभाषेचा, ग्रामीण संस्कृतीचा, तेथील रितीरिवाजांचा त्यांच्यावर प्रभाव पडला आहे. जीवनविषयक चिंतन मांडताना त्यांनी बऱ्याच अंशी प्रतिमा आणि प्रतीकांचा वापर केलेला आहे. त्यामुळे आत्मचरित्राचे सौंदर्य खुलले आहे. संवादातून प्रसंग उभा करण्याची त्यांची शैली अनोखी आहे. त्यांच्या वाङ्मयीन जाणिवांचा आणि साहित्यमूल्यांचा प्रबंधकर्त्याने शोध घेतला आहे.

डॉ. जनार्दन वाघमारे हे अतिशय प्रयोगशील आणि उपक्रमशील व्यक्तिमत्व म्हणून प्रस्तुत आत्मचरित्रातून पाहायला मिळतात. त्यांच्या एकूणच जीवनचरित्राचा चिकित्सक अभ्यास करुन मूलगामी स्वरुपाचे चिंतन मांडल्या गेले आहे.



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani. Distt. Bhandara

ISSN : 2278-9308
January, 2023

डॉ. जनार्दन वाघमारे हयांचे शैक्षणिक (वाड्:मयीन) कर्तृत्व :–

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि राजकिय क्षेत्रात आपले कर्तृत्व सिध्द केले तरी त्यांचे वाड्:मयीन कर्तृत्व आणि कामगिरी मराठी साहित्य विश्वात वाखाणण्याजोगी अशी आहे. शालेय शिक्षण घेताना त्यांचा अनेक साहित्यिक मंडळींशी

संपर्क आला. अनेक साहित्यिकांचे साहित्य वाचून त्यांचा वाड्:मयीन गोष्टीकडे कल गेला. त्यातूनच त्यांचे वाड्:मय फुलले, बहरु लागले. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून त्यांनी काव्यलेखन केले. 'मेरा सपना' या कवितेतील काही ओळी पुढीलप्रमाणे.

''देंखे जीवन में अनेक सपने
सपनो में निहारा जीवन सुंदर
सपना सुंदर जीवन सुंदर
दोनो भी है अति सुंदर
सपना तो सपना है
क्या जीवन भी सपना है ?''

डॉ. जनार्दन वाघमाऱ्यांनी इंग्रजीतूनही काही कविता लिहिल्या.

'Lead on, Youth'

" I remember, I remember'
Our first meeting my dear
When we met
We did not sit
Close to each other".

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी 'Forget me Not'या नावाचे इंग्रजीत तीन अंकी नाटक लिहिले होते. त्यांच्यावर रविंद्रनाथ टागोर, सरोजिनी नायडू यांच्या कवितांचा प्रवाह होता. दिनकर, मैथिलीशरण गुप्त, महादेवी वर्मा व जयशंकर प्रसाद या हिंदी कवींच्या काव्याचा प्रभाव होता. मराठी ही त्यांची मातृभाषा असल्यामुळे बरेचसे कवी, लेखक त्यांनी वाचून काढले होते.

औरंगाबादला आल्यानंतर डॉ. वाघमाऱ्यांची वाड्:मयीन उर्मी फोफावू लागली. डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. म. ना. वानखेडे प्राचार्य म. भि. चिटणीस अशा साहित्य, समाज या क्षेत्रातील दिग्गजांशी त्यांच्या जवळून संपर्क आला. मराठवाडयात 'अस्मितादर्श' ची वाड्:मयीन चळवळ नावारुपाला येऊ पाहात होती. त्या चळवळीशी लेखकाचा संपर्क आला. निग्रो साहित्याबद्दल लेखकाने लिखाण करुन आपले वाड्:मयीन आणि सामाजिक दातृत्व सिध्द करून दाखविले. प्रा. रा. ग. जाधव, प्रा. वा. ल. कुलकर्णी, मे. पु. रेगे, भालचंद्र फडके अशा थोर मंडळींशी त्यांचा परिचय आला. सुरुवातीच्या 'अस्मिता' असेच ठेवले. 'अस्मिता' चे संपादक प्रा. रा. ग. जाधव, मिलींद कॉलेज सोडून बाहेर निघून गेल्यावर पुढे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी तिचे नाव 'अस्मितादर्श' ठेवून वाड्:मयीन प्रवास अखंडित चालू ठेवला. त्या अस्मितादर्श मध्ये वाघमाऱ्यांची एक कविता प्रसिध्द झाली. ती अनेक लिखाणात लोकांनी उद्धृत केली. पुढे लेखक दलित नसल्याचे कळल्यानंतर तिचा उल्लेख करणे लोकांनी टाळले. त्या कवितेच्या शेवटच्या ओळी पुढीलप्रमाणे होत्या.

''मी जन्माला आलो नसतो तर
आभाळाला फुटलाच नसता हंबरडा
सुर्याच्या डोळयांना आलीच नसती अंधारी
झालीच नसती मृत्यूशी रोज रोज भेट
कळलेच नसते मला माणसाचे खरेखुरे मन''

सन १९६८ च्या दिवाळी अंकात 'अमेरिकन निग्रो : रक्त आणि अश्रू' हा प्रदिर्घ लेख प्रसिध्द झाला. दलित साहित्यावर वृत्तपत्रांनी पुरवण्या काढल्या, विशेषांक काढले. 'दै मराठवाडा' श वृत्तपत्राचे संपादक अनंत भालेराव यांनी एक दिवाळी अंक दलित साहित्यावर काढला. त्यांच्याही अंकात निग्रो साहित्यावर लेखकाने लिखाण केले. पुढे त्यांनी 'अमेरिकन निग्रो : साहित्य व संस्कृती' या नावाचे मराठीतील पहिले पुस्तक लिहिले. त्यांचे 'हाक आणि आक्रोश' हे ही पुस्तक विशेष गाजले. सन १९८४ मध्ये ते पुस्तक प्रकाशित झाले. लेखकाने दलित साहित्यावर अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. डॉ. नांदापूरकर व्याख्यान मालेत त्यांनी अतिशय मूलभूत स्वरुपाचे व्याख्यान दिले. लेखकाच्या शैक्षणिक आणि वाड्:मयीन कर्तृत्वामुळे विविध समित्यांवर त्यांची निवड होऊ लागली.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. मराठवाडा साहित्य परिषदेवर सदस्य म्हणून ते निवडल्या गेले. पुढे मराठवाडा साहित्य परिषद लातूरच्या शाखेचे ते अध्यक्ष झाले.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, (CCLXXXVII) 387
ISSN : 2278-9308
January, 2023

वाङ्‌मयीन कर्तबगारी पार पाडीत असतांना सामाजिक क्षेत्रातही त्यांची यशस्वी वाटचाल सुरू होती. म. फुले पुण्यस्मृती शताब्दी कार्यक्रमाचे ते सरचिटणीस झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी म्हणून त्यांची निवड करण्यात आली. म. फुले चरित्र साधने प्रकाशन समितीचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. म. फुले स्मारक समितीचे ते पुढे सदस्य झाले. ते मंडळ आयोगाचे समर्थक होते. नामांतराचे समर्थक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा त्यांच्यावा फार प्रभाव होता. राजर्षी शाहू महाविद्यालयात त्यांनी पाली हा विषय सुरु केला होता. त्यांच्यावर बौध्द संस्कृतीचा प्रभाव होता. या गोष्टीतून त्यांचे लिखान सुरू होते. दलित जीवनाबद्दलची ओढ आणि लिखान कार्य यामुळे शासनाने त्यांना दिनांक १४ एप्रिल १९९४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

डॉ. जनार्दन वाघमारे यांनी मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतून मुलगामी स्वरूपाची ग्रंथसंपदा प्रकाशित केली.
यातील काही ग्रंथांचा उल्लेख पुढीलप्रमाणे करता येईल.

१) महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजकारण
२) शिक्षण : समाज परिवर्तन आणि राष्ट्रीय विकास
३) प्राथमिक शिक्षण : याशापयश आणि भवितव्य
४) साहित्यचिंतन
५) आजचे शिक्षण : स्वप्न आणि वास्तव
६) समाज परिवर्तनाच्या दिशा
७) समाज परिवर्तन की दिशाऐं (अनुवादित)
८) चिंतन एका कुलगुरुचे
९) जीवनरेखा (व्यक्तिचित्रे)
१०) The Quest for Black Identity
११) एक शिक्षाविद् का चिंतन (अनुवादित)
१२) परिवर्तन : संकल्पना, वेध आणि वास्तव (गौरवग्रंथ)
१३) चिंतनयात्रा
१४) ज्ञान — विज्ञानाच्या देशात (प्रवास वर्णन)
१५) व्यक्तिवलये (व्यक्तिरेखा)
१६) बखर ऐका खेडयाची (कादंबरी)
१७) The Horizons & Beyond
१८) संवाद
१९) चिंतन एका नगराध्यक्षाचे

अशी विपुल ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे.

**'मूठभर माती' ची वाङ्‌मयीन वैशिष्टये आणि मुल्यमापन :—**

मराठी साहित्यात एक दर्जेदार कलाकृती म्हणून 'मूठभर माती' ला ओळखलेजाते. तिच्या वाङ्‌मयीन गुणवत्तेमुळे दर्जेदार आत्मचरित्राच्या यादीत 'मूठभर माती' समाविष्ट केली जाते. काही कुलगुरुंनी स्वतःचे आत्मचरित्र लिहिले आहे. पण आकाराने आणि जीवनातील संघर्षाच्या स्वरुपाने या आत्मचरित्राचे अनन्यसाधारण महत्व आहे. 'मूठभर माती' च्या भाषाशैलीच्या काही मर्यादा असल्या तरी इतरही अनेक माध्यमांव्दारे आपल्या भाषेचे लालित्य व परिनामकारकता वाढवण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे. इंग्रजी, मराठी कविता आणि काही सुविचारांचा वापर आणि विशेषतः संत तुकारामांच्या अभंगांचा अनेक ठिकाणी नेमकेपणाने केलेला वापर 'मूठभर माती' च्या भाषाशैलीची गुणवत्ता वाढवित असल्याची नोंद डॉ. अनंत राऊत घेतांना दिसतात. ती नोंद खरी आहे. 'मूठभर माती' चे वाङ्‌मयीन मूल्यमापन करतांना डॉ. राऊत म्हणतात, 'मूठभर माती' ची गुणवत्ता भरपूर विस्तार पावलेल्या, घनदाट सावली देणाऱ्या वडासारखी आहे. तर त्यातील मर्यादा इवल्याशा लाजाळूच्या रोपटयासारख्या आहेत. आपल्या समाजामध्ये वेगवेगळया क्षेत्रात ध्येयधुंद व मुल्यनिष्ठ वृत्तीने काम करु पाहणाऱ्या लोकांना उत्तम असे मार्गदर्शन करण्याचीखूप मोठी क्षमता 'मूठभर माती' मध्ये घेतलेले पीक हिरवेहिरवे, डौलदार आहे. कुणाच्याही डोळयाचे पारणे फेडणारे आहे. डॉ. वाघमारे यांची मूठ विनम्रतेने 'मी छोटी आहे' सांगत असली आणि तिच्यातल्या मातीत दोन इवलीशी पानेच उगवलेली आहेत सांगत असली, तरी ते खरे नाही. या मूठीतील मातीमध्ये उगवलेले कसदार पीक इथून पुढच्या अनेक पिढयांची मूल्याला व बौध्दिक भूक उत्तमपणे भागवणार आहे. डॉ. राऊतच्या या विधानावरुन प्रस्तुत आत्मचरित्राची महत्व लक्षात येते.

डॉ. वाघमाऱ्यांची ओळख केवळ आत्मचरित्रकार म्हणूनच नाही तर ललित आणि वैचारिक लेखक म्हणूनही आहे. कादंबरी आणि आत्मचरित्र यांच्या स्वरुपात विलक्षण फरक असला तरी लालित्यापूर्णता हा आत्मचरित्रातही जपावा लागतो.



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

केवळ वस्तुनिष्ठ माहिती पुरविणे हेच कायम लेखक करीत नाही. तर त्याचबरोबर लालित्यपूर्ण, कलात्मकरित्या, त्या प्रसंगात जीव ओतावा लागतो. तेव्हाच रसिकांशी हृदयसंवाद साधता येतो. 'मूठभर माती' या आत्मचरित्रातील पहिली दोन प्रकरणे फारच खाजगी वाटू लागतात. पण बालपण वाचतांना ते सारे प्रसंग आपलेच असे वाचकांना वाटू लागते. त्या काळात शिकलेल्या साऱ्यांनाच हया प्रसंगातून जावे लागले आहे. हा भाग विचारात घेतला तर पहिली दोन प्रकरणेही वाङ्:मयीन कसोटीला उतरु शकतात. प्रकरण तीन पासूनच्या आत्मचरित्राला जी उंची लाभली ती व्यक्तीची आत्मनिष्ठा वाङ्:मयीन आत्मनिष्ठा होते म्हणून वाङ्:मय असतेच मुळी आत्मनिष्ठ. परंतू त्यातला 'स्व' व्यापक झालेला असतो. लेखक प्रयोगशील आहेत. सर्जनशीलता, कल्पकता, अभ्यास आणि तक्र हे लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे अंगभूत घटक आहेत. हे सर्व घटक त्यांच्या वाङ्:मयीन कलाकृतीत दिसून येतात. त्यांच्या शैलीत काव्यात्मता अवतरते. त्यांचे कारण त्यांच्या काव्यात्मवृत्तीत आहे. त्यांच्या इंगंजी अध्यापनाचा त्यांच्या भाषाशैलीवर चांगलाच प्रभाव आहे. त्यांची वाङ्:मयीन वैशिष्टये प्रतिपादन करतांना डॉ. विनय अपसिंगेकर म्हणतात, '' ....... ते जागोजागी इंग्रजी लेखकांची अवतरणे देतात. खरे तर त्यांची भाषा प्रासादिक असली तरी ती दृष्यांतप्रिय आहे. एखाद्या घटनेच्या या विधानाच्या समर्थनार्थ त्यांच्या लेखनीला लगेच चपखल उदाहरण सुचते. मनात विचार डोकावत असावा. खोल अंधाऱ्या विहिरीच्या काठावरुन आपण पाण्यात डोकावतो तसे, (पृ. १९३) अशा अनेक उपमा दृष्यांतांनी त्यांची शैली काव्यात्म रुप घेते. विशेषत: स्वत:च्या आईवडीलांचा विषय निघावा, वा गावाचा. त्यांच्या आंतरिक उमाळयांना काव्यात्म रुप येते. अशी त्यांच्या लिखानाबद्दलची नावीन्यपूर्णता डॉ. अपासिंगेवर यांनी अधोरेखीत केली आहे.

'मूठभर माती' चे सूक्ष्म निरीक्षण केले तर त्यात डॉ. वाघमाऱ्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व स्पष्ट जाणवते. विवेकशिलता, संवेदनशिलता, संयम, स्वावलंबन, प्रयत्नशिलता, सर्जनशिलता, प्रयोगशिलता आणि उपयुक्तशिलता यांचा मनोज्ञ संगम त्यांच्या व्यक्तिमत्वात पाहायला मिळतो. या गुणांमुळेच प्रस्तुत आत्मचरित्र अंतर्मुख करायला लावते. विचारप्रवृत्त करायला लावते.

'मूठभर माती' चे मूल्यमापन करतांना डॉ. नागोराव कुंभार, 'समाजातील ताण–तणाव, शुभ–अशुभ प्रवृत्तीचे दर्शन घडविणारे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकिय जीवनासंबंधी गुणदोषासह मूलगामी भाष्य करणारे एक महत्वाचे ऐतिहासिक दस्ताऐवज असल्याची नोंद घेतात. 'मूठभर माती' हा एक वाङ्:मयीन मूल्ये आहे. प्रस्तुत आत्मचरित्राचे वाङ्:मयीन मूल्यमापन नसीर देशमुख म्हणतात, ''मानसशास्त्रीय पध्दतीने 'मूठभर माती' चा विचार केल्यास लेखकाच्या मनातील काहूर लक्षात येतो.ते त्यांनी काही प्रतिमाद्वारे प्रकट केल्याचे आढळून येते. या आत्मकथनाला 'अतिव्यक्तिवादाला' शक्यतो टाळले आहे. त्यामूळे या आत्मकथनाची वाचनियता वाढलेली आहे. जाणीव आणि नेणीव या दोन मनामुळे लेखक परिपक्व दिसतो. त्यामुळेच दर्जेदार आत्मकथनाची आपल्याला प्रचिती येते. या आत्मकथनात ज्ञानशोधकता आहे. प्रगल्भ, नैतिकता, देशीयता, आत्मीयता आहे. यामूळे वाचकाला आस्वाद प्रक्रियेत सखोल, चौफेर रमता येते. या आत्मकथनात लेखक स्वत: आस्वाद घेतो. मत व्यक्त करतो. नंतर तत्व शोधतो. हे विशेषच म्हणावे लागेल. त्यात अनुबंधदर्शिका आहे. समतोल लययुक्त रचना आहे. म्हणून सौंदर्य निर्माण झाले आहे. त्यामुळे या आत्मकथनास एक विशिष्ट घाट प्राप्त झाला आहे.या आत्मकथनाचे सौंदर्य लेखकाच्या बुध्दिगम्यतेत, आशयात, घाटात दडलेला आहे''.

अशाप्रकारे 'मूठभर माती' हे एकुणच त्यातील आशय, अभिव्यक्तीने खुललेले आत्मचरित्र आहे. त्यातील ज्ञान चिंतनाच्या सखोल बैठकीमुळे केवळ ते रंजनचकरित नाही तर प्रबोधनाचा उच्चांक गाठतो.

**निष्कर्ष :–**

- कठोर मेहनती स्वभाव, ज्ञानपिपासू वृत्ती, बुध्दिप्रामाण्यवादी, वैज्ञानिक प्रवृत्ती, प्रयोगशील, सर्जनशील, मनमिळावू, शिस्तप्रिय अशा अनेक विशेषणांच्या बेरजेतून डॉ. वाघमारे यांचे व्यक्तिमत्व बनलेले आहे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तसेच काही पुरोगामी विचारवंताच्या विचारांचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर विलक्षण प्रभाव पडता. ते नामातंराच्या बाजूने होते. त्यांचे व्यक्तिमत्व रोखठोक, निर्भीड आणि स्वयंभू वृत्तीचे असल्याचा आपल्याला प्रत्यय येतो.
- जातीयता आणि अस्पृश्यतेविषयी तसेच भूमीहिनांच्या विषयी त्यांनी गावात आणि आजुबाजूला ठोस स्वरुपाचे कार्य केले आहे.
- ओघवत्या शैलीत निवेदन करुन प्रसंगी बोलीभाशेचा वापर करुन ग्रामीण जीवनाचा बाज उत्तमपणे त्यांनी प्रकट केला आहे.
- आर्य समाजाच्या प्रभावातून आणि संस्कारातून त्यांनी आर्य समाजाच्या सुलोचना नावाच्या पदवीधर मुलीशी विवाह करण्याचे धारिष्टये दाखविले. आणि स्वत:पासून परिवर्तनाची चळचळ सुरु केली.



Off. Principal
Late. N.P.W. College

- आपल्या लिखाणाला वाङ्‌मयीन सौंदर्य प्राप्त करण्यासाठी प्रसंगी त्यांनी म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा, प्रतीके, आणि मिथक व सुभाषितांचा वापर करुन आपल्या चिंतनशिलतेला तत्वज्ञानाची बैठक प्राप्त करुन दिली आहे.
- फारशी संवादात्मकता टाळूनही त्यातील काव्यात्मक शैलीमुळे त्यांच्या निवेदनात बोजडपणा येत नाही त्यामुळे रसिकांना खिळवून ठेवण्यात ते यशस्वी होतात.
- त्यांच्या निवेदनशैलीत उपहास आणि उपरोध काही अंशी पाहायला मिळतो. निवेदन करतांना ते बऱ्याचदा मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू कवींच्या काही ओळी उद्‌धृत करतात त्यामुळे निवेदनाला एक वेगळी वैचारिक पार्श्वभूमी निर्माण होते.

❖ संदर्भ ग्रंथ सूची :–

१) डॉ. जनार्दन वाघमारे – 'मूठभर माती', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६
२) फ. म. शहाजिंदे – 'मूठभर माती' ( आशय व अन्वयार्थ ), लातूर, १३ नोव्हें. २००८
३) डॉ. जनार्दन वाघमारे – 'अमेरिकन निग्रो: साहित्य व संस्कृती' लोकवाङ्‌मयगृह प्रकाशन, मुंबई, १९७८

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bh...

Late N. P. W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref. No.......
Dt.